Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक २५] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ११-१७, २०२२/श्रावण २०-२६, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२०.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

ज्याअर्थी, मा. प्रशासक, नगरपरिषद, पुसद यांचा दिनांक २०-०७-२०२२ रोजीचा ठराव क्र. ८९ अन्वये पुसद शहराचे मंजूर विकास योजनेमध्ये किरकोळ फेरबदल करण्याचे निश्चित झाले आहे. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार विकास योजनेमध्ये फेरबदल करण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मुख्याधिकारी यांना प्रदान केले आहे ;

त्याअर्थी, मी, डॉ. किरण सुकलवाड, मुख्याधिकारी, नगर परिषद, पुसद खालीलप्रमाणे आदेश काढीत आहे .—

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये पुसद शहराच्या मंजूर विकास योजनेत किरकोळ बदल करणेबाबत.**

**अधिसूचना**

क्रमांक नपपु-नगर रचना विभाग-१६९-२०२२—२०२३.—

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व आरोग्य विभागाचे क्रमांक टीपीएस–२७९५-१२६७-सीआर-१९८-९५-यु. डी.,-१३, दिनांक २६ मे १९९८ अन्वये पुसद शहराची विकास योजना मंजूर केलेली असून ती दि. २६ जुलै १९९८ पासून अंमलात आली आहे.

नगर परिषद पुसदने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) च्या तरतुदीप्रमाणे खाली दर्शविल्याप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले आहे .—

**किरकोळ फेरबदल**

(१) मौज पुसद खंड–१ मधील शेत स.नं. ४४/२ व नविन स. नं. ५४/२ मधील क्षेत्र ४.०५ हे. आर ची जागा सदर जागेवर " पुसद तालुका सहकारी जिनिंग ॲन्ड प्रेसिंग फॅक्ट्री " करिता आरक्षित जागा विद्यमान औद्योगिक वापराखाली दर्शविली आहे. सदर " पुसद तालुका सहकारी जिनिंग ॲन्ड प्रेसिंग फॅक्ट्री " चे आरक्षणातून वगळून "वाणिज्य व रहिवासी" विभागामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

वरील किरकोळ फेरबदल दर्शविणारा नकाशा नगर परिषद पुसदच्या कार्यालयात, कार्यालयीन वेळेत लोकांना अवलोकन करण्याकरीता ठेवला आहे. वरिल फेरबदलाबाबत तक्रारी अथवा सूचना नागरिकांनी महाराष्ट्र राज्य शासनाचे राजपत्रात सदर्हु नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत मुख्याधिकारी, नगर परिषद, पुसद यांचेकडे दाखल कराव्यात म्हणजे शासनाकडे वरील फेरबदलाचा प्रस्ताव मंजुरी करिता पाठविण्यापूर्वी आलेल्या तक्रारी अथवा सूचना यांचा विचार केला जाईल.

**डॉ. किरण सुकलवाड,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पुसद.

पुसद :
दिनांक ८ ऑगस्ट २०२२.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२१.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Minor Modification under Section 37 *(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

*NOTIFICATION*

No. MCP-TPD-169-2022-23.—

The Development Plan of Pusad has been sanctioned by Government Urban Development and Public Health Department *Vide* Resolution No. TPS-2795-1267-CR-198-95-UD-13, dated 26th May 1998 and came into force from 26th July 1998.

The Municipal Council, Pusad has proposed following Minor Modification to the said Development Plan under Section 37 (*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 *Vide* their Resolution No. 89, Dated 20-07-2022.

**MINOR-MODIFICATION**

(1) In Mouja Pusad Part-1 old Survey No. 44/2 and new Survey No. 54/2 having area 4.05 Ha. Shall be excluded from “Pusad Taluka Sahakari Ginning and Pressing Factory” shall be included in the “Commercial and Residential Zone.”

The Plan Showing the above Minor Modifications is kept Open for Public inspection during office hours in the office of the Municipal Council, Pusad.

The objections and suggestions in respect of above proposed modification may be sent in writing to the Chief Officer, Municipal Council, Pusad within 30 days from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette.*

The suggestions or objections received within time would be considered before submitting the proposal to Government for sanction.

Dr. KIRAN SUKALWAD,
Chief Officer,
Municipal Council, Pusad.

Pusad :
Dated the 8th August 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.